




साप्ताहिक

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे  Editor : Anil Waghmare








■ वर्ष ११ ■ अंक ३६ ■ शुक्रवार, दि. २ एप्रिल २०२६ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

11th year, 36 th paper, Friday Date: 2 April 2026 , R.N.I. MAHMAR/2015/62614, Postal Permission : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 Price : Rs.1, Pages :4, Page -1


## आता थोड्याच दिवसात आपली दररोज भेट होणार...!

# दैनिक डोंगरचा राजा!

आपल्या सर्वांच्या पाठबळावर साप्ताहिक डोंगरचा राजाची वाटचाल सुरु आहे... दर बुधवारी डोंगरचा राजा आपल्या भेटीला येतो... आता बदलत्या काळानुसार डोंगरचा राजाही बदलत आहे... आठ दिवसाऐवजी आता डोंगरचा राजा दरोज वाचकांच्या भेटीला येत आहे... येत्या काही दिवसात मान्यवरांच्या उपस्थितीत डोंगरचा राजाच्या प्रथम अंकाचे प्रकाशन होईल.. या पार्श्वभूमीवर या सर्व प्रवासाचा आढावा घेण्याचा मोह टाळता येत नाही... एका दैनिकाचा तालुका प्रतिनिधी म्हणून काम करत असतांना स्वतंत्र साप्ताहिक सुरु करुन संपादक म्हणून जबाबदारी सांभाळण्याची हिंमत केली ती केवळ वाचकांच्या पाठबळावरच.... तेच पाठबळ आता दैनिक सुरु करतांनाही आवश्यक आहे...! वडवणी, माजलगाव, धारुर बरोबरच संबंध जिल्ह्यातील हितचिंतकांनी अगदी पहिल्या अंकापासूनच भरभरुन प्रेम केले, पाठींबा व्यक्त केला कधी शाब्दीक तर कधी आर्थिक आधार दिला... या आधाराच्या जोरावरच आजवरचा प्रवास सक्षमपणे करता आला... आताही पुढची वाटचाल जिल्हाभरातील वाचकांच्या पाठबळावरच होणार आहे.

प्रत्येक क्षेत्रात प्रगती झाली... स्पर्धा वाढली... महागाई वाढली त्याला वृत्तपत्र क्षेत्रही अपवाद नाही... अशा स्पर्धेच्या वातावरणात आजुबाजूला होत असलेले बदल स्विकारत अन् महागाईला तोंड देत आमचे मार्गक्रमण सुरु आहे. प्रारंभापासूनच डोंगराचा राजाचा बुधवारचा अंक चुकणार नाही याची काळजी घेतली... एखाद दिवस मागे पुढे झालाच तर वाचकांचे येणारे फोन, भेटेल तो आज अंक नाही का असे विचारणार... वाचकांचे आपल्यावर असलेले हे प्रेम पाहून आम्ही एकही आठवडा खंड पडू दिला नाही. अगदी कोरोना लॉकडाऊनमध्येही आम्ही अखंडपणे वाचकांपर्यंत पोहचत होतो. त्या काळातही सर्वसामान्यांचे प्रश्न लावून धरण्याचे काम डोंगरचा राजाच्या माध्यमातून केले.



वडवणी तालुका हा तसा ऊसतोड मजुरांची संख्या जास्त असणारा तालुका. परंतु काही काळात या तालुक्याचा चेहरामोहरा बदलत आहे. कुंडलिकासह इतर प्रकल्पामुळे या भागातील ऊसतोड मजूर आता बागायतदार झाला आहे. ज्यांची हयात ऊसतोडीत गेली ते आज मातब्बर ऊसतोड बागायतदार म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. शेतीबरोबरच शिक्षण, समाजकारण, राजकारणातही वडवणी तालुक्याने ओळख निर्माण केली आहे. विशेषतः माजलगाव मतदारसंघातील आपले स्थान अधोरेखित केलेले आहे. डोंगरचा राजाच्या वाटचालीत वडवणीकरांचा नक्कीच मोठा आधार यापुर्वी मिळाला आहे. भविष्यातही तो कायम राहील याची खात्री आम्हाला आहे.

डोंगरचा राजाने प्रारंभी वृत्तपत्राच्या माध्यमातून जनतेचा आवाज बुलंद केला. डीजीटल आवृत्ती, वेबसाईट व यु ट्युब चॅनलच्या माध्यमातून वेगवेगळ्या स्वरुपात जनतेचे प्रश्न मांडण्याचे काम केले जात आहे. डोंगरचा राजाला वृत्तपत्र स्वरुपात जसे भरभरुन प्रेम वाचक, हितचिंतकांचे मिळाले तसेच डिजीटल आवृत्ती व यु ट्युबलाही मिळत आहे.... असेच प्रेम आता दररोज येणाऱ्या डोंगरचा राजावरही कराल, ही मला खात्री आहे...डोंगरचा राजाच्या माध्यमातून मांडले गेलेले अनेक प्रश्न मार्गी लागले असले तरी आणखी काही उभेही राहीले आहेत... ते सोडवण्यासाठी आमचा पाठपुरावा सुरुच राहणार आहे. यासाठी वाचक, हितचिंतकांचा भक्कम आधार असायलाच हवा. आगामी काळात सर्वसामन्यांच्या हितासाठी, वडवणीसह माजलगाव मतदारसंघाबरोबरच जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची डोंगरचा राजाची भूमिका अधिक आग्रही राहणार आहे. यापुढील काळात आपल्या सर्वांच्या पाठबळावर प्रवास सुरुच राहणार आहे!

**अनिल वाघमारे**
**संपादक**

# वडवणी तालुक्याच्या प्रगती मूल्यांकनासाठी आढावा बैठक

## सर्वांगिण विकासासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांना सूचना

**बीडः प्रतिनिधी**

**आकांक्षीत तालुका कार्यक्रम अंतर्गत सुरु असलेले संपूर्णता अभियान २.0 बद्दल मा. जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये प्रगती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालयात येथे सखोल आढावा दि. 0१/0४/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाली. सोबतच वडवणी तालुक्यातील विविध विकास कामांचा सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्यात आला. आकांक्षीत तालुका कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करणे, आणि पुढील उपाययोजना गावपातळीपर्यंत प्रभावी पद्धतीने राबवविणे असे या बैठकीचे उद्दिष्ट्य होते.**





सदरील बैठकीत आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी आणि पायाभूत सुविधा यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये वडवणी तालुक्याच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यात आले, व त्याआधारे मा. जिल्हाधिकारी यांनी वरील विषयावर सविस्तर मार्गदर्शन करत सर्व निर्देशांक पूर्ण करण्या संदर्भात सूचना दिल्या.

आरोग्य विभागांतर्गत राबवण्यात येत असलेला विविध योजना व शासकीय आरोग्य केंद्र व उपकेंद्रावर गरोदर माता प्रसूती वाढवण्यासाठी तालुक्यातील जनतेस आव्हान केले आहे.शिक्षण विभाग अंतर्गत मुलींच्या सुरक्षितता व उच्च शिक्षण वाढावे आणि शाळा सोडण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करून त्या मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात परत आण्यात करिता वडवणी तालुक्यामध्ये विवध ठिकाणी कॅमेरे प्रस्थापित करणे, शिक्षणाचा स्तर उंचावणे, सर्व शाळेत कार्यरत शौचालये उपलब्ध असावे यासाठी पुढील उपाय योजना आखण्यात आल्या. कृषी क्षेत्रात रेशीम शेतीमध्ये मनरेगासोबत यशस्वी समन्वयावर चर्चा करत, राज्यामध्ये रेशीम उत्पन्नामध्ये प्रथम कसे येत येईल व बचत गटामार्फत निर्मिती, विक्री व शास्वत व्यवसाय स्थापित करण्याकरिता यासोबतच ''सौर ग्राम संकल्पनेवर'' आणि प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये नवीकरणीय ऊर्जेचे लाभार्थी वाढण्यासाठी विशेष मोहीम राबिवण्याचे निर्देश केले.

आढावा बैठकी दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गावपातळीवरील अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी वडवणी तालुक्यात अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र- कुप्पा व ग्रामीण रुग्णालय वडवणी चे उर्वरित कामे दर्जेदार आणि लवकर पूर्ण करण्यासंदर्भात सूचित केले.

**सदरील आढावा बैठकी दरम्याण मा. जिल्हाधिकारी महोदयांनी आगामी प्रकल्पांमध्ये बचत गटांसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ निर्माण करण्यासाठी 'बचत भवन' आणि स्थानिक उपजीविकेला चालना देण्यासाठी 'उमेद मार्ट' च्या बांधकामाचा समावेश, उसतोड कामगारांच्या बालकांसाठी निवासी वसतिगृह, कस्तुरबा गांधी बालिका विध्यालायाचा मॉडेल शाळा म्हणून समावेश व नवीन १३ अंगणवाडी केंद्रांना, औद्योगिक प्रशिक्षण संस्था () प्रशासकीय इमारत बांधकाम, वडवणी नगर पंचायत इमारत फर्नीचर साहित्य पुरवठा, ग्रामीण रुग्णालय चिंचवण येथील रुग्णालयास फर्नीचर पुरवठा करणेबाबत सोबतच जनसुविधा क सामाजिक वनीकरण, महाउर्जा अश्या अनेक कामांसोबत - योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत विविध विकास कामे, - योजना यशस्वीपणे राबवून आकांक्षीत तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला व भविष्यातील कार्ययोजनेत प्रशासनाने द्वारे वडवणीला एक आदर्श तालुका म्हणून विकसित करण्याच्या विश्वास व्यक्त केला आहे.**



# बीडच्या तकलादू विकासाला 'रेड सिग्नल'!

## अवकाळी पावसात सिग्नल जमीनदोस्त; मोठा अनर्थ टळला

बीड : प्रतिनिधी

शहरातील नगर नाका परिसरात उभारण्यात आलेला सिग्नल सुरू होण्यापूर्वीच अवकाळी पावसाच्या पहिल्याच सरीत कोसळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संबंधित कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिग्नलचा खांब अचानक कोसळल्याने त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या एका नागरिकाच्या अंगावर पडता पडता तो थोडक्यात बचावला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला असला तरी ही घटना अत्यंत गंभीर मानली जात आहे.

सदर सिग्नल अद्याप कार्यान्वितही झाला नव्हता. त्याआधीच तो कोसळल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत आणि देखरेखीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणी जबाबदार कोण, याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, प्रशासनाने या घटनेची दखल घेऊन तातडीने पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



श्री.अंकुशभाऊ शिंदे पाटील यांचे वडील स्वर्गीय राजसाहेब शिंदे पाटील यांचे दुःखद निधन झाल्यानंतर राजकारणातील भीष्माचार्य माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांनी शिंदे कुटुंबीयाची सांत्वन पर भेट घेऊन अस्थेवाईक पणे चौकशी केली.

# महिला दिनानिमित्त महिला पत्रकार व रणरागिणीचा सन्मान सोहळा



लोणावळा:प्रतिनिधी

लोणावळा येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्न पुणे जिल्हा महिला पत्रकार व लोणावळा शहर पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय महिला पत्रकार व रणरागिणीना सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरवात महिलादिन विशेष काव्य मैफिलीने करण्यात आली

सादरकर्त युवा साहित्य प्रतिष्ठान मुंबई. कवी संतोष खारटमोल कवी आनंद रांजणे कवी ओमकार देसाई कवीयत्री सविता देशमुख यांनी अप्रतिम से कवी मैफिल जमवली त्यात एक छोटी कलाकार मृण्मई काळे व शोभा आहेर यांनी सुंदर कविता सादर केली. स्वागत गीत सुनिल मस्के यांनी आपल्या सुरेख व दमदार आवाजात–

जय जय महाराष्ट्र माझा सादर केले प्रस्तावना पुणे जिल्हा अध्यक्ष श्रावणी कामत यांनी केली कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा.सारिकाताई सुनिल आण्णा शेळके ह्या होत्या. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद अध्यक्षा शोभा जयपुरकर, सरचिटणीस विद्या म्हासूर्णेकर, जिल्हा अध्यक्ष सुनिल लोणकर, राज्य कार्यकारणीचे सदस्य अनिल वडघुले, जेष्ठ पत्रकार चंद्रकांत जोशी, नगराध्यक्ष राजेन्द्र सोनावणे, नंदकुमार वळंज (उद्योजक ) व जेष्ठ पत्रकार कुमठकर श्रीराम यांनी मनोगत व्यक्त केल्या. परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शन खाली हा कार्यक्रम व महिला हे घर सांभाळून बाहेरची काम करतात त्यांना त्यांच्या कामाची पावती व पाठीवर थाप मिळावी हा छोटा सा प्रयन्त..

त्याना पुढील कार्यास शुभेच्या व अभिनंदन. वसंत व्याख्यान माला लोणावळा, नेतृत्व बचत गट, वुमन्य फाउडेशन, इंडियन स्काउट गाईड , फेलोशिप लोणावळा गिल्ड.. आधारस्तंभ बचत गर, वैदही बचत गट, निवारा वृद्धाश्रम च्या छाया काळे , हिरकणी महिला स्वयंसहायता बचत गट सिधुताई कविश्वर, डॉ, सिमा शिंदे परमेश्वरी दामले, विभावरी इंगळे, नयना आभाळे, दक्षता कमिटी, दामिनी पथक, जेष्ठ नागरीक संघ.यांना पुरस्कार, देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व महिला पत्रकारांचे ट्रॉफी व शाल देऊन सन्मान करण्यात आले.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सारिका ताई शेळके, दिपालीताई हुलावळे , रेश्मा देवकर, नंदकुमार वळंज (उद्योजक), अनिल वडघुले, सुनिल लोणकर (जिल्हा अध्यक्ष ), राजेद्र सोनावणे(नगराध्यक्ष )सभापति स्वप्मा कदम, नारायण पळिकर, शोभा जपुरकर, विद्या म्हासुर्णेकर, लोणावळा शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पाटील, पुणे शहर अध्यक्ष प्रमोद गव्हाणे,विशाल विकारी,माऊली भोसले,प्रशांत पुराणिक,बापु पाटील, श्रीराम कुमठेकर, जेष्ठ पत्रकार चंद्रकांत जोशी ,डॉ. हेमंत अगरवाल, मा.नगरसेविका ब्रिन्दा गणत्रा,उमा मेहता, सुषमा कडू सुजाता गुरव रेखा भेगडे ,प्रज्ञा आबनवे,वर्षा चव्हाण,सुनिता आगळे,आदी मान्यवर उपस्थित होते तसेच आदित्य कामत, प्रफुल सोनवणे सुनिल मस्के, अवनी आगळे यांचा कार्यक्रमांस मोलाचा वाटा सूत्रसंचालन सुनिता कसबे व रश्मी शिरसकर तर आभार शोभा जयपुरकर यांनी मानले



# तिरुपती स्कुल येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

वडवणी : प्रतिनिधी

वडवणी मधील तिरुपती प्रायमरी स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनाच्या अध्यक्ष स्थानी वडवणी नगराध्यक्ष शेषेराव जगताप तर उद्घाटन स्थानी मा. बन्सीधर भाऊ मुंडे उपनगरअध्यक्ष प्रमुख पाहुणे श्री बंडूजी खांडेकर, अंगद नरवडे, नगरसेवक नागेशजी डिगे, महारुद्र चोरमले, सचिन आंधळे, पप्पू दादा शिंदे, शाळेचे संचालक लक्ष्मीकांत सोळंके, मुख्याध्यापक प्रा. गणेश सोळंके यांची उपस्थिती होती. प्रा. गणेश सोळंके यांनी प्रस्ताविक केले .तर सुत्रसंचलन पुजा बागडे यांनी केले या स्नेहसंमेलना निमित शाळेच्या वतिने तिरुपती रत्न पुरस्कारः- वेदिका कवचट या विद्यार्थ्याला देण्यात आला तर पुरस्कारः- कुणाल वरकड, महेश नरवडे, सिध्दी गोरे, ईश्वरी बादाडे, राधिका राठोड, अंतरा कोकणे, जान्हवी पंधारे, सुशिल राठोड यांना देण्यात आले तर शाळेचा या वर्षीचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, सौ. पुजा बागडे, ज्ञानेश्वर फपाळ, प्रविण घुमरे यांना देण्यात आला. या कार्यक्रमात वडवणी तालुक्यातील प्रथम महिला पत्रकार यांना आदर्श महिला पत्रकार पुरस्कार श्रीमती. गितांजली लव्हाळे वानखडे .यांना प्रदान करण्यात आला. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, कॉमेडी साँग, महाभारत, भारूड या गाण्यावर सदाबहार नृत्यसादर केले या कार्यक्रमात शाळेच्या वतीने सर्व शिक्षकाचा यथोचित सत्कार याठिकाणी करणात आला हा स्नेहसंमेलनाची यशस्वी परंपरा कायम ठेवण्यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक प्रा. गणेश सोळंके, पूजा बागडे, ज्ञानेश्वर फपाळ, प्रवीण घुमरे, अंजनी कुमार औटी, अमोल पतंगे, अश्विनी क्षीरसागर, श्रध्दा क्षीरसागर, सिंग सर, अश्विनी मावशी, ड्रायव्हर माऊली सुरनार. साई स्कूलच्या प्राचार्य. वर्षा सोळंके, प्रियंका रोटे, अमोल राठोड, अण्णासाहेब खोचरे राजाभाऊ भारती, अजित गायके, विक्रम गार्डी,

वरद सोळंके यांनी परिश्रम घेतले तर आभार प्रदर्शन औटी अंजनीकुमार यांनी मानले.

# चुलत बहिनीवर लैंगिक छळ केल्याप्रकरणी आरोपीस दहा वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

बीड : प्रतिनिधी

दिनांक. २४.०४.२०१७ रोजी आरोपी यांनी चुलत बहिनीवर बळजबरीने लैंगिक छळ केल्याप्रकरणी गेवराई येथील रहिवाशी असलेला आरोपी नामे. राहुल सुरेश राका यास मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. आनंद एल. यावलकर साहेव यांनी दोषी ठरवून १० वर्ष सश्रम करावास व ५०००/रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास एवढया दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अ‍ॅड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले

या प्रकणी थोडक्यात हकिगत अशी की, दिनांक २२.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता पिडीतेचे आई वडील व भाउ हे बाहेर गेले असल्याचे पाहुन आरोपी नामे राहुल सुरेश राका हा आमच्या घरात आला व नेहमीप्रमाणे त्याने मला आज तु माझेसोबत झोप नाहीतर मी तुझी व्हिडीओ शुटींग व्हायरल करील असे म्हणून त्याने आमच्या टि.व्ही च्या खोलीत नेवुन खोलीचे दोन्ही दरवाजे बंद करून मला पलंगावर बळजबरीने झोपवुन माझे सोबत लोखंडी पलंगावर नग्न आवस्थेत बलात्कार केला.

मी त्याला विरोध करत असतांना त्याने मला बळजबरीने तोंड दाबुन धक्काबुक्की केली. तेव्हा अचानक माझा भाउ घरी आला असता आरोपी मागच्या दरवाज्यातून पळुन गेला. सदर घटनेच्या एक वर्ष आगोदर देखील आरोपी याने कॉलेजमधून बोलावून घेवून त्याच्या फोर व्हिलर मध्ये बसवुन गेवराई येथे कोणत्या तरी लॉज वर नेवून माझेवर अतिप्रसंग केला होता व त्याचे व्हिडीओ सोशल मिडीयावर टाकुन बदनामी करीन असे म्हणून ब्लॅकमेल करून व मला वारवार धमकी देवून माझेवर अतिप्रसंग करता होता.

पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन गेवराई येथे आरोपी विरूध्द कलम ३७६,३७६(),३७६(),३७६() ४५२,३२३,२०१ भादवी प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील सपोनि के. के. बोर्डे यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

सदर प्रकरणी सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. आनंद एल. यावलकर साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी

सरकारी पक्षातर्फे एकुण १२ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणत पिडीता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. आनंद एल. यावलकर साहेब यांनी आरोपी यास कलम ३७६,३७६(),३७६(),३७६() ४५२,३२३,२०१ भादवी अन्वये यांनी दोषी ठरवून १० वर्ष सश्रम करावास व ५०००/रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास एवढया दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले त्यांना अ‍ॅड. शशिकांत एस. सावंत यांनी सहकार्य केले, तसेच जिल्हा सरकारी वकील श्री. अजय दि. राख यांनी मार्गदर्शन केले तपास अधिकारी पोनि. श्री के. के. बोरडे व पैरवी अधिकारी महिला पोलीस कॉन्स्टेबल सविता चव्हाण मॅडम व श्रीकांत पाखरे यांनी सहकार्य केले.



वडवणी शहरातील भगवान महावीर चौक येथे सत्य, अहिंसा आणि शांतीचा मार्ग दाखवणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. वडवणीचे तहसीलदार श्री वैभव महिंद्रेकर, जेष्ठ नेते विनोदकुमार नहार यांच्यासह शहरातील जैन बांधव महावीर जयंतीनिमित्त उपस्थित होते.

# भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या शकुंतला बादाडे यांचे निधन

वडवणी: प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील रहिवाशी असलेले राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर असणाऱ्या शकुंतला चंतृभुज बादाडे यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी वर्धापकाला ने मंगळवार दि ३१ रोजी पहाटे राहत्या घरी निधन झाले.सक्षम इंग्लिश स्कूलचे संचालक बालासाहेब बादाडे यांच्या मातोश्री होत्या.त्यांच्यावर काडीवडगाव येथील हिंदू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या शकुंतलाताई बादाडे ह्या स्व प्रमोद महाजन,स्व गोपीनाथराव मुंडे,स्व विमलताई मुंदडा,मा खा जयसिंगराव गायकवाड यांच्या सानिध्यात राहून राजकीय सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य त्यांच्या हातून घडले. माजलगाव तालुक्याच्या भारतीय जनता पार्टीच्या पहिल्या तालुका अध्यक्ष व भारतीय जनता पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष होण्याचे भाग्य त्यांना लाभले.तोडा बचाव आंदोलन, अयोध्या येथील श्री राम जन्म भूमीसाठी कार सेवक म्हणून त्यांचा सक्रिय सहभाग होता. राजकीय व सामाजिक क्षेत्रात त्यांच्या सून जोष्णताई बादाडे व बालासाहेब बादाडे यांना चांगली शिकवण त्यांनी दिली.पुढे त्यांच्या पावलावर पाऊल टाकत उच्चशिक्षित जोष्णाताई बादाडे या भारतीय जनता पार्टीच्या तालुका अध्यक्ष जोष्णताई बादाडे त्यांचा वारसा सक्षमपणे पुढे चालवत आहेत. शकुंतलाताई गावातील धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमात हिरारीने सहभाग घेत असत. त्यांच्या निधनाने काडीवडगाव सह पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर काडीवडगाव येथील हिंदू स्मशानभूमीमध्ये अखेरचा निरोप देण्यात आला यावेळी राजकीय, सामाजिक, शेतकरी, कष्टकरी, व्यापारी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती,१ मुलगा २ मुली, जावई नातू पंतू असा मोठा परिवार आहे.




**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. मनोहर भीमा पवार

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– १) श्री.जितेंद्र बाबुराव वाघमारे २) श्री. रामेश्वर आंबादास गवळी

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. २६९७ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) १) श्री.जितेंद्र यांचा पुर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी. २) श्री. रामेश्वर यांचा यांचा पुर्व पश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी.

श्री. जितेंद्र :पुर्व – गवळी यांचा प्लॉट, पश्चिम – धावडे यांचा प्लॉट
दक्षिण – रस्ता, उत्तर – रस्ता

श्री. रामेश्वर : पुर्व : भाग्यनगर व लोणकर, पश्चिम –वाघमारे यांचा प्लॉट , दक्षिण – रस्ता , उत्तर – रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव – श्रीमती. वर्षा मनोज गार्डी

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– १) श्री. सतिष श्रीमंत देशमुख २) श्री. किरण श्रीमंत देशमुख

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४६ प्लॉट क्र.१४ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) पुर्वपश्चिम १२ मीटर दक्षिणोत्तर ०९ मीटर एकुण क्षेत्रफळ १०८ चौ.मी.

पुर्व – प्लॉट क्र.४५, पश्चिम – प्लॉट क्र.४३
दक्षिण – ०९ मीटर रस्ता, उत्तर – ओपन स्पेस

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. लक्ष्मण तुळशिराम आंधळे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– श्री. विजय नारायण चौरे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. २३७७ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) पुर्वपश्चिम १५ फुट दक्षिणोत्तर ४० फुट एकुण क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी.

पुर्व – दिनेश मस्के यांचा प्लॉट, पश्चिम – अंडील सर यांचा प्लॉट
दक्षिण – १५ फुटाचा रस्ता
उत्तर – गुंदाटे सर यांचा प्लॉट

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. राहील अहेमद शेख

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– श्रीमती रुक्मिनी रोहिदास घोडेराव

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. ३५८१ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर ५० फुट एकुण क्षेत्रफळ १३९.४० चौ मी

पुर्व – प्लॉट, पश्चिम – गुलाब नारायण राऊत
दक्षिण – रस्ता
उत्तर – डोंगरे यांचा प्लॉट

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव १) श्री. रईस रज्जाक शेख २) श्री. आदम रज्जाक शेख विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– श्रीमती. हमीदा रज्जाक शेख

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. २०९७ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) पुर्वपश्चिम १० फुट दक्षिणोत्तर ३७ फुट एकुण क्षेत्रफळ ३४.३८ चौ.मी.

पुर्व – पंजाबराव मस्के, पश्चिम – शेख फारुख
दक्षिण – बीड–परळी रोड
उत्तर – शेख लतीफ

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव १) श्री. संदिप भास्कर सिरसट २) श्री. बालासाहेब सुदाम कोकाटे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– श्री. संजयकुमार शांतीलाल लुंकड मुआ श्री. शातीलाल लालचंद बोरा

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.५२९ प्लॉट क्र. ४७ वडवणी येथील आहे., सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) पुर्वपश्चिम ०६ मी. दक्षिणोत्तर ०९ मी. एकुण क्षेत्रफळ ५४ चौ.मी.

पुर्व – प्लॉट क्र. ४६, पश्चिम – प्लॉट क्र.४८
दक्षिण – ०९ मीटर रस्ता, उत्तर – प्लॉट क्र.४४–

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव – १) श्री. बाबादेव विश्वनाथ बडे २) श्री. विक्रम श्रीमंत बडे, विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– श्रीसिचिन सुधाकर धायतिडक, प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४६ प्लॉट क्र.६८ मिळकत क्र.४४७० वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) पुर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ १११.५२ चौ.मी.

पुर्व – रस्ता, पश्चिम – प्लॉट क्र. ७६४ व प्लॉट क्र. ७७
दक्षिण – प्लॉट क्र.६७, उत्तर – प्लॉट क्र. ६८

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.३१/०३/२०२६

अर्जदाराचे नाव १) श्री. संजय आलु चव्हाण २) श्री. सागर वसंत राठोड

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव– श्रीमती. संगिता गोरख केदार

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४६ प्लॉट क्र.६९ मिळकत क्र.४९६९ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार–१) पुर्वपश्चिम १२ मी. दक्षिणोत्तर १३.७१ मी. एकुण क्षेत्रफळ १६४.५२ चौ.मी

पुर्व – रस्ता, पश्चिम – प्लॉट क्र.७४, दक्षिण – उदावंत भिकचंद चा प्लॉट क्र.६९ मधील, उत्तर – प्लॉट क्र. ७०

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
शुक्रवार, दि.२ एप्रिल २०२६ । पान ४

### देवडी येथील राम मंदिरास एक लाखाचा सभामंडप अर्पण

देवडीःरामनवमीच्या पावन मुहूर्तावर देवडी येथील श्री राम मंदिराला गावचे सुपुत्र तथा प्रगतशील शेतकरी दत्ता रामचंद्र काळे यांच्या वतीने एक लाख रुपये खर्चुन उभारलेला भव्य सभामंडप अर्पण करण्यात आला. या उपक्रमामुळे मंदिर परिसराचे सौंदर्य खुलले असून भाविकांची मोठी सोय झाली आहे.दत्ता काळे यांनी आपल्या दिवंगत आई प्रभावती रामचंद्र काळे आणि मावशी सुशिला लक्ष्मिकांत काळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा समाजोपयोगी उपक्रम राबविला आहे. कुटुंबातील वडीलधाऱ्यांच्या आठवणी जपत मंदिरासाठी योगदान देण्याच्या त्यांच्या या निर्णयाचे ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले. रामनवमीच्या दिवशी विधिवत पूजा आणि मंत्रोच्चारात या सभामंडपाचे लोकार्पण करण्यात आले. सुविधेमुळे आता मंदिरात धार्मिक व सामाजिक कार्यक्रम घेणे सुलभ होणार आहे.

# उदगीरच्या अधिवेशनात राऊतांची रोखठोक मुलाखत...

## पुढारी न्यूजचे संपादक प्रसन्न जोशींची प्रमुख उपस्थिती; पत्रकारांच्या प्रश्नांवर होणार मंथन

सामनाचे संपादक, खासदार संजय राऊत यांची परवा सामना कार्यालयात भेट झाली.. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचं ४४ वं राष्ट्रीय अधिवेशन १८ आणि १९ एप्रिल २०२६ रोजी उदगीरला होतंय ..

अधिवेशनात संजय राऊत यांची मुलाखत घ्यावी अशी कल्पना समोर आली.. लगेच त्यांना फोन केला.. कल्पना सांगितली.. ते म्हणाले, मंगळवारी सामना कार्यालयात या.. बोलू..

आम्ही गेलो.. "तुमच्या मुलाखतीचा कार्यक्रम ठेवायचा आहे, आपण संमती द्यावी" अशी त्यांना विनंती केली.. ती त्यांनी मान्य केली.. राऊत साहेब.

१९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता उदगीर येथे

संजय राऊत यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम होईल.. पुढारी न्यूज चे संपादक, लोकप्रिय अँकर प्रसन्न जोशी संजय राऊत यांची मुलाखत घेणार आहेत.. अधिवेशनात विविध कार्यक्रम आहेत.. संजय राऊत यांची मुलाखत सर्वात लक्षवेधी ठरणार यात शंका नाही..

सामनाकार बाळासाहेब ठाकरे हे परिषदेचे सदस्य होते.. ते आमच्या एक-दोन कार्यक्रमांना देखील आले होते.. संजय राऊत देखील अहिल्यानगर जिल्ह्यात कर्जत येथे झालेल्या परिषदेच्या पुरस्कार वितरण सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.. त्यामुळे परिषदेची ओळख करून देण्याची गरज पडली नाही.. उलट ते म्हणाले, "अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचं काम मी बघतो, तुमचं नेटवर्कही छान आहे"

बरं वाटलं.. आम्हाला आणखी काय हवं होतं?

राज्यातील पत्रकारांचे प्रश्न, पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आणण्यात सरकार करीत असलेली टाळाटाळ, पत्रकारांवरील वाढते हल्ले, विविध पध्दतीनं माध्यमांचा आवाज बंद करण्याचा होत असलेला प्रयत्न हे सारे विषय तर त्यांनी समजून घेतलेच शिवाय सांप्रतच्या राजकीय, सामाजिक प्रश्नावर देखील जवळपास तासभर गप्पा झाल्या.. संजय राऊत यांचे शत्रू हजार आहेत,

त्यांच्या रोखठोक स्वभावामुळे दररोज त्यात भर पडत असते.. असं असलं तरी जराही विचलित न होता, ते कणखरपणे, बेडरपणे आपली भूमिका, मतं मांडत असतात..

भूमिका घेणारे संपादक हल्ली दुर्मिळ झालेत.. अशा स्थितीत राजकीय, सामाजिक, पत्रकारितेच्या विषयावर स्पष्ट,



रोखठोक भूमिका घेणारे संजय राऊत मला नेहमीच जवळचे, आपले वाटतात..

दररोजची राजकीय धावपळ, पत्रकारांचा गराडा, खासदार म्हणून कराव्या लागणारया दिल्ली वारया आणि प्रकृती साथ देत नसताना देखील आपला पत्रकारितेचा जो मुळ पिंड आहे, त्याकडे त्यांनी अजिबात दुर्लक्ष होऊ दिलं नाही हे मला विशेष कौतुकास्पद वाटतं..

अग्रलेख, रविवारचा त्यांचा लोकप्रिय कॉलम अखंडपणे सुरू आहे.. रूग्णालयात असतानाही त्यात खंड पडलेला नव्हता हे विशेष.. मुंबईत असले की, ते सकाळी अकरा वाजता सामना कार्यालयात असतात.. आम्हाला अकराची वेळ दिली होती.. बरोबर ते अकराच्या ठोक्याला कार्यालयात हजर झाले.. या साऱ्या धावपळीचा तब्येतीवर परिणाम होणारच.. त्यांनी काळजी घेतली पाहिजे.. पण तसं होत नाही.. कारण ते केवळ केबिनमध्ये बसून उपदेश करणारे संपादक नाहीत, चळवळीशी नातं असलेले संपादक आहेत.. ते स्वस्थ बसू शकत नाहीत, तो त्यांचा पिंड नाही.. मी गेली ४० वर्षे त्यांना पाहतो आहे.. माझा आणि संजय राऊतांचा एक योगायोग असा की, मी चुकत नसेल तर १९९४ ला ते सामनात आणि मी दैनिक कृषीवलला संपादक म्हणून एकाच दिवशी रुजू झालो ..

या गोष्टीला आता ३२ वर्षे झालीत.. एकाच दैनिकात एवढा प्रदीर्घ काळ संपादक म्हणून काम करण्याचा विक्रम संजय राऊत यांच्या नावावर नक्की नोंदविला जाईल.. मी कृषीवलला अठरा वर्षे होतो..मला बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखे मालक-संपादक लाभले नाहीत.. त्या अर्थानं संजय राऊत भाग्यवान ठरले.. हल्ली संपादकांचा कार्यकाळ दोन - तीन वर्षांपेक्षा जास्त नसतो..कोण कोणत्या वर्तमानपत्राचा संपादक आहे हे कळतही नाही, कोणाला सांगताही येत नाही.. मात्र संजय राऊत आणि सामना हे नातं घट्ट आहे.. सामना म्हटलं की, संजय राऊत हे नाव समोर येतं.. असो..

संजय राऊत यांच्याशी मस्त गप्पा झाल्या.. संजय राऊत यांना आपण दररोज टीव्हीवर बघत असतो... मात्र उदगीर मध्ये संजय राऊत यांना प्रत्यक्ष पाहण्याची, त्यांना ऐकण्याची, त्यांची स्पष्ट, सडेतोड मतं जाणून घेण्याची संधी राज्यातील पत्रकारांना लाभणार आहे.. पत्रकारांसाठी ही आनंद पर्वणी आहे.. म्हणूनच राज्यातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उदगीरला आलं पाहिजे...

**एस.एम.देशमुख**

## महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सदस्यांनी सहभागी व्हावे:प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

मुंबई :प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे उदगीर जिल्हा लातूर येथे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे.या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनात डिजिटल मिडिया परिषदेच्या महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



याबाबत अधिक वृत्त असे की, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन मुख्य विश्वस्त श्री एस.एम. देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली दर दोन वर्षांनी महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यात होत असते. या वर्षीचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन हे लातुर जिल्ह्यातील उदगीर या ठिकाणी दिनांक १८ आणि १९ एप्रिल २०२६ रोज होत आहे. या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन लोकमत माध्यम समुहाचे मुख्य संपादक श्री.राजेंद्रबाबु दर्डा यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या अधिवेशनाचे मुख्य आकर्षण असणार आहेत. त्याच बरोबर उबाठाचे नेते खासदार संजय राऊत यांची थेट मुलाखत होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि इतर मान्यवर मंत्री, खासदार,आमदार, सेलिब्रिटी त्याच बरोबर या राष्ट्रीय अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे बांधकाम राज्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्रीमंत.छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले,माजी मंत्री आ.संजय बनसोडे हे असणार आहेत. आपण आपल्या जिल्ह्यातील डिजिटल मिडीया परिषदेचे जिल्हाध्यक्ष या नात्याने सर्वांना या राष्ट्रीय अधिवेशनाची माहीती द्यावी. व अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम सर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या परिषदेच्या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनात येत्या १८ आणि १९ एप्रिल रोजी उदगीर येथे सहभागी व्हावे. अशा सुचना देऊन महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्व जिल्ह्यांनी सहभागी होण्यासाठी जिल्हाध्यक्षांनी तयारी करावी असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



## माजलगाव मतदारसंघात शेतकऱ्यांना वीजपुरवठा सुरळीत करावा:आ.सोळंके

माजलगावःप्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून ग्रामीण भागातून शेतीसाठी लागणारा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. या पार्श्वभूमीवर महावितरण विभागाची आ. प्रकाश सोळंके यांनी आढावा बैठक घेतली.

आ.प्रकाश सोळंके यांनी बैठकीत सांगितले की,शेतकऱ्यांना सुरळीत ८ तास वीज उपलब्ध व्हावी यासाठी उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर तातडीने उपाययोजना करून वीजपुरवठा नियमित करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच नवीन फीडरची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करून अतिरिक्त भार कमी करण्याबाबतही निर्देश देण्यात आले. आर.डी.एस.एस. () भाग-१ अंतर्गत सुरू असलेल्या , केबल, ३३ केव्ही व ११ केव्ही उच्चदाब वाहिन्यांचे जाळे मजबूत करणे, तसेच जुन्या तारा बदलण्याच्या कामांचा आढावा सुद्धा बैठकीत घेण्यात आला.त्याचबरोबर आर.डी.एस.एस. भाग-२ अंतर्गत कृषी व अकृषी वाहिन्यांचे विलगीकरण, तसेच एडीबी योजनेअंतर्गत नवीन उपकेंद्र उभारणी, अतिरिक्त रोहित्र बसविणे आणि उपकेंद्र क्षमतावाढ या कामांच्या प्रगतीचाही सविस्तर आढावा देखील त्यांनी घेतला.

बैठकीत नागरिकांकडून आलेल्या विविध मागण्याही मांडण्यात आल्या. त्या मागण्यांवर आधारित प्रस्ताव तयार करून येत्या काळात त्यांची पूर्तता करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आ.प्रकाश सोळंके यांनी सूचना दिल्या.



## जळीत व्यवसायिकांना आर्थिक मदत

वडवणीःप्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथे दिनांक २४ मार्च २०२६ रोजी रात्रीच्या वेळेस अचानक दुकानाला आग लागल्याने या दुर्घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. याची दखल घेवून ऍड. आनंद काळे यांनी रविवारी भेट घेवून चार व्यावसायिक यांना रोख २५ हजार रुपये आर्थिक मदत करत पुन्हा व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील कापड दुकान, टेलर व्यवसायिक, हॉटेल, ऑनलाईन कामे दुकान अशी चार दुकानाला बुधवार रोजी रात्री अचानक आग लागली. यात अंदाजे २५ ते ३० लाख रुपयांचे नुकसान झाले होते. त्यांना आधार म्हणून आनंद काळे यांच्या वतीने त्यार दुकानदारांना आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. दादा बळीराम इंगळे १० हजार रुपये, प्रकाश महादेव गायकवाड ५ हजार रुपये, अनंत नामदेव काळे ५ हजार रुपये, अतुल कानडे ५ हजार रुपये अशी रोख मदत केली. यावेळेस राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सांवत, बाळासाहेब घुमरे, वृक्षराज निपटे, श्रीनिवास निपटे सह गांवकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## धारदार शस्त्रांसह चार संशयित जाळ्यात

केज : प्रतिनिधी

केज येथील बस स्टँड परिसरात मध्यरात्री संशयास्पद रित्या वावरणाऱ्या चार तरुणांना पोलिसांनी कारसह ताब्यात घेतले आहे. ३१ मार्च रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे आणि त्यांचे पथक गस्तीवर असताना त्यांना एका पांढऱ्या रंगाच्या स्वीफ्ट कारमध्ये हे तरुण लपून बसलेले आढळले. या कारच्या काचा काळ्या रंगाच्या असून संशयितांनी स्वतःची ओळख लपवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी कारची झडती घेतली असता त्यामध्ये एक लोखंडी कोयता आणि लाकडी काठी मिळून आली.

ताब्यात घेतलेले संशयित प्रेम गायकवाड, वैभव गायकवाड, सुमीत गायकवाड आणि हर्षद चंदनशिवे हे सर्व धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील रहिवासी आहेत. पोलिसांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली,

मात्र कसून चौकशीत गुन्हेगारी उद्देशाने शस्त्रे बाळगल्याचे समोर आले. पोलीस नाईक विष्णू नागरगोजे यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपणे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## दुचाकी चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

बीडःप्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने परळीमध्ये मोठी कारवाई करत एका विधीसंघर्ष बालकाला ताब्यात घेतले आहे. परळी शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास करताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी या बालकाच्या राहत्या घरी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी त्याच्याकडून तीन चोरीच्या दुचाकी हस्तगत केल्या असून यात एक स्कुटी आणि दोन मोटारसायकलचा समावेश आहे. सखोल चौकशीत या विधीसंघर्ष बालकाने परळी परिसरातूनच या गाड्या चोरल्याची कबुली दिली. या यशस्वी कामगिरीमुळे परळी आणि संभाजीनगर पोलीस ठाण्यातील भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अंतर्गत दाखल असलेले दोन महत्त्वाचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत आणि अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या पथकाने ही धाडसी कारवाई पूर्ण केली असून जप्त केलेला सर्व मुद्देमाल पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी परळी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला आहे.









This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Waghmare Anil Shriram at Pragati Offset , Panchshilnagar, Wadvani, Tq. Wadvani, District. Beed, Maharashtra-431144 and published at the office of Weekly Dongarcha raja, Main Road, Wadvani, Tq. Wadvani, District Beed, Maharashtra- 431144, email:dongarcharaja@gmail.com, Mo.9422591805 (Not every news and artical in this issue has to be agreed upon by the editor, under the Wadvani court of appeals)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)